# “ <u>ज्ञानाची शेती</u> ”

## विषमुक्त (Residue Free) अंजीर उत्पादन तंत्रज्ञान

**श्री. अंकुश बरडे, एम.एस.सी. (कृषी)**

अंजीर हे एक मलबेरी फळवर्गीय पिक असून या कुळामध्ये औदूंबर (उंबर), वड, पिंपळ, पिंपरण ई. झाडे येतात. या फळाचा उगम दक्षिण अरबस्तानात असल्याचे मानले जाते. तुर्की, स्पेन, इटली, ग्रीस, पोर्तुगाल, कॅलिफोर्निया, न्युझिलंड या देशामध्ये अंजीराचे लागवड केली जाते. एकट्या तुर्की देशामध्ये जागतिक एकूण उत्पादनाचे 30% एवढे उत्पादनात होते. भारतामध्ये या पिकांची काही राज्यात लागवड केली जाते. महाराष्ट्र हा अंजीर उत्पादनात अग्रेसर असून पुणे जिल्ह्यातील पुरंदर, छ. संभाजीनगर जिल्ह्यातील दौलताबाद परिसर अंजिरासाठी प्रसिध्द आहे.

आपलेकडे जे अंजिर पिकवले जाते ते ताजे फळ म्हणूनच खाण्यासाठी वापरले जाते तर वर नमूद ईतर देशातील अंजीर हे सुके अंजिर या प्रकारातील आहे. आपलेकडे ताजे फळ खाल्ले जात असल्याने या पिकाचे विषमुक्त (Residue Free) उत्पादन घेणे अत्यंत आवश्यक आहे त्यासाठी आज आपण अंजीर लागवड तंत्रज्ञान पाहणार आहोत.



**हवामान** :-

अंजीर हे समशितोष्ण कटिबंधातील, पानगळ होणारे झाड असून ऊन व थंडी या पिकास मानवते. म्हणजेच कोरडी, उष्ण हवा या फळपिकास फार चांगली असते आणि थंडीचा फारसा या पिकावर विपरित परिणाम होत नाही. ओलसर, दमट, जास्त आर्द्रता युक्त, जास्त पावसाच्या प्रदेशात या पिकाची लागवड फायदेशीर होत नाही.

ज्या प्रदेशातील सरासरी 500-600 मिलि पाऊस पडतो व तो ऑक्टोमध्ये थांबतो. डोंगराळ, हलक्या जमिनीचा प्रदेश या पिकाचे लागवडीसाठी उत्कृष्ट समजला जातो. जास्त पाऊस, जास्त आर्द्रता असल्यास फळास गोडी येत नाही, फळास भेगा पडतात. किड व रोगांचा प्रार्दूभाव जास्त होतो. कमी तापमान व जास्त आर्द्रता असल्यास याची फळे तडकतात.

या फळ पिकाची वाढ होत असताना 35-37$^0$C पेक्षा कमी तापमान व पावसाचा अभाव असणे ही अंजिराची लागवड यशस्वी होण्यास व चांगल्या दर्जाची फळे मिळण्यास आवश्यक बाब आहे. कमी पावसाचा प्रदेश ज्या ठिकाणी ऑक्टोबर ते मार्च पर्यंत पाण्याची सोय आहे अशा ठिकाणी अंजीर लागवडीस वाव आहे.

या पिकाची ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये पानगळ होऊन झाडे सुप्त अवस्थेत जातात. ऑक्टोबरमध्ये, ऑक्टोबर हिट मुळे झाडास नवीन पालवी फुटते. ऑक्टोबर - डिसेंबर काळात उष्ण तापमानात बऱ्यापैकी असते, यामध्ये नवीन फूट व फळे चांगली वाढतात व मार्च - एप्रिलमध्ये ही फळे बाजारात विक्रीस येतात.

**जमीन** :-

अंजिराची मुळे साधारणत: 3 फूट खोल जातात त्यामुळे जमिनीची निवड करताना हलक्या ते मध्यम परंतू खोल, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमिन आवश्यक असते. हलक्या जमिनीत लागवड करावयाची असेल तर त्यासाठी भरपूर सेंद्रिय पदार्थाचा वापर करावा लागतो व अशा जमिनीत पिक चांगले येते.

तांबूस रंगाची, चिकण माती व खाली 3 फूटापर्यंत मुरूम असलेली जमिन या पिकासाठी उत्कृष्ट समजली जाते. चुनखडी असलेल्या तांबूस, काळ्या मातीतही अंजिराची वाढ चांगली होते मात्र खूप काळ्या मातीची जमीन या फळझाडास अयोग्य असते. हलक्या मगदूराच्या, तांबूस काळ्या व भरपूर चुना असलेल्या जमिनीत सासवड, दिवे, सोनोरी (ता. पुरंदर, जि. पुणे) या परिसरात या फळपिकाची लागवड आपणास आढळते.



**अंजिराचे प्रकार व वाण** :-

अंजिराचे पुष्कळ प्रकार जगभरामध्ये आढळून येतात त्यामध्ये स्मिरना या प्रकारातील कॅलीमिर्ना जात ही युरोप व अमेरिकेत लागवड केली जाते. त्यानंतर ॲड्रिॲटिक जिला कॉमन पण म्हणतात हा प्रकार आपलेकडे लागवडीसाठी वापरला जातो व व्हाईट सॅन पेड्रो हा कॉमन व स्मिरना या दोन्हीमधला प्रकार त्यास परागीभवनाची गरज असते, यामध्ये सॅन पेट्रो, कॅप्रिफिग व जेनंटाईट या नावाची जाती आहेत.

ॲड्रिडॅटिक किंवा कॉमन या प्रकारात फळधारणा आपोआप होते. आपलेकडील अंजिर या प्रकारातील असून यामध्ये ब्लॅक इस्चीया, ब्राऊन टर्की, टर्कीश व्हाईट, काबूल, मार्सेल्स या जातीची निरनिराळ्या भागात यशस्वीपणे लागवड केलेली आढळते.

**आपलेकडील प्रचलित जाती** :-

1) **पुना अंजिर** :- पुणे-सासवड या भागात लागवडीखाली असलेली जात, कॉमन या प्रकारात मोडते. हा प्रकार स्मिरनापेक्षा अधिक सोयीचे, कमी कष्टाचे किंवा निर्धोक आहे. या फळाचा आकार घंटीसारखा व रंग किंचित जांभळा असतो. फळांचा गर गुलाबी असून साल पातळ असते व फळाचे सरासरी वजन 50 ग्रॅम असते एकूण विद्राव्य घटकाचे प्रमाण 18-20 एवढे असते.

2) **दिनकर** :- हा वाण पुना अंजिर या जातीमधून निवडपध्दतीने विकसित केलेला आहे. याची वैशिष्ट्ये पुना अंजिर प्रमाणेच आहेत. फळ किरमिजी लाल रंगाचे, फळाचे वजन 40-70 ग्रॅम, ब्रीक्स 18-20 व एका झाडापासून 25-30 किलो फळे मिळतात.

3) **दिएन्ना** :- ही अमेरिकन जात असून या जातीचे फळे मोठ्या आकाराची सोनेरी रंगाची असतात. फळाचे सरासरी वजन 50-100 ग्रॅम, ब्रिक्स 22-24 व एका झाडापासून 25-28 किलो फळे मिळतात. या वाणाची लागवड राजस्थान, आंध्रप्रदेश, तेलंगणा व तामिळनाडू मध्ये मोठ्या प्रमाणात झालेली आहेत.

4) **फुले राजेवाडी** :- ही जात पुना अंजिर या जातीमधून निवड पध्दतीने विकसीत केली असून या जातीची फळे आकर्षक अंजिरी रंगाची असतात. फळाचे सरासरी वजन 50-70 ग्रॅम व 10-20% ब्रिक्स एवढे विद्राव्य घटकांचे प्रमाण असते. पूर्ण वाढ झालेल्या झाडापासून 30-40 किलो मिळतात.

महाराष्ट्रामध्ये लागवडीसाठी शेतकऱ्यांनी **" फुले राजेवाडी "** या वाणाची लागवड करावी. या वाणाचे रोपे म.फु.कृ.वि. राहूरी अंतर्गत गणेश खिंड, पुणे येथील रोपवाटिकेमध्ये मिळतात.

**लागवड** :-

जमिनीची निवड केल्यानंतर उन्हाळ्यात तिची चांगली मशागत करावी. जमिन नांगरून, ढेकळे फोडून सपाट



करावी.

हलक्या ते मध्यम प्रकारच्या जमिनीत अंजिर लागवडीसाठी 4.5 X 3 मी आणि भारी जमिनीत 5X5 मी अंतरावर 1X1X1 मी आकाराचे खड्डे खोदावेत. हे खड्डे उन्हाळ्यात 2 महिने तापू द्यावेत व पावसाळा सुरू होण्यापूर्वी म्हणजेच मे महिण्याचे अखेरिस भरून घ्यावेत.

खड्डे भरण्यासाठी शेणखत 25-30 किलो, सिंगलसुपर फॉस्फेट 1.5 किलो, 50 ग्रॅम प्रत्येकी ट्रायकोडर्मा, स्फुरद विरघळणारे जिवाणू, पालाश उपलब्ध करून देणारे जिवाणू व अॅझोस्पिरिलियम यांचा वापर करावा. खड्डे भरताना वरिल सर्व मिश्रण एकसारखे, खड्ड्यामध्ये मिसळेल याची दक्षता घ्यावी.

**रोपांची निवड** :-

अंजिराची रोपे फाटे कलम अथवा गुटी बांधून तयार केली जातात. यामध्ये फाटे कलम सोयीस्कर व स्वस्त, कमी श्रमात व कमी कालावधीमध्ये तयार होते त्यामुळे शेतकरी फाटे कलमाची लागवड करतात. रोपाची निवड करताना दोन फुटवे आलेली 1-2 फूट उंचीची कलमे निवडावीत जास्त उंचीची कलमे लागवडीसाठी वापरू नयेत.

चांगले 2/3 पाऊस झालेनंतर जुलै मध्ये या पिकाची लागवड करावी वर नमूद भरलेल्या खड्ड्याच्या मधोमध कलमाचे पिशवीचे आकाराचा खड्डा करून कलम अलगद त्यामध्ये लावावे व खोडाभोवती हलका दाब देऊन कलमाचे मुळांशी पोकळी राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी त्यानंतर लगेच हलके पाणी द्यावे. नविन लावलेल्या कलमांना काठीचा आधार द्यावा

**झाडास आकार देणे - छाटणी** :-

कलमाची लागवड केल्यावर 1 ते 1.5 महिण्यात कलमांना नवीन पालवी फुटते. अंजिराची झाडे लहान असताना त्याच्या खोडास जमिनीपासून धुमारे (फुटवे) फूटतात. यापैकी 3-4 फूटवे एकसारख्या अंतरावर असलेले व गर्दी न करता ठेवावेत. अंजिर पिकासाठी एक खोड पध्दत लागवड पध्दत शिफारस करण्यात येत नाही. 3-4 खोडे ठेवण्यास खोडकिडी चे प्रार्दूभावामुळे संपुर्ण झाड वाया जाण्याचा धोका राहत नाही. या 3/4 खोडाची वाढ चांगली करून घ्यावी. अनावश्यक, गर्दी करणाऱ्या फांद्या छाटाव्यात, सेंटर ओपन राहिल व सर्व खोडाचे फांद्या बाहेरील बाजूस राहतील, गर्दी करणार नाहीत या पध्दतीने वेळोवेळी पाहावे. जमिनीकडे वाढणारे, झाडाच्या आतील भागात (पोटात) गर्दी करणाऱ्या, तिरप्या फांद्या काढून टाकाव्यात फांद्याची छाटणी करताना फांद्या ज्या ठिकाणाहून खोडास फुटतात त्या ठिकाणाहून सफाईदारपणे छाटाव्यात म्हणजे त्या ठिकाणी कुजण्याची क्रिया होणार नाही.



**एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन** :-

लागवडीनंतर दर 4 महिण्याची अंजिर पिकास 15:15:15, 12:32:16, 10:26:26, DAP व पोटॅश अशा संयुक्त खताची 100 ते 250 ग्रॅम मात्रा बहार धरण्यापर्यंतचे वयाचे झाडास द्यावीत. शेणखत हे जुन चे रासायनिक खतासोबत द्यावे. आपण अंजिर बागेस कोणता बहार धरणार आहोत यावर बहाराची खताची वेळ ठरवावी लागते. सर्वसाधारणपणे खट्टा बहारासाठी जुनच्या पहिल्या आठवड्यात तर मिठा बहारासाठी ऑगस्ट - सप्टेंबरमध्ये खते द्यावीत.

कृषी विद्यापिठांनी पूर्ण वाढ झालेल्या अंजिर बागेस प्रति झाड 50 किलो शेणखत, 1125 ग्रॅम नत्र, 325 ग्रॅम, स्फुरद व 415 ग्रॅम पालाश या प्रमाणे खत मात्रा देण्याची शिफारस केलेली आहे. यामधील नत्र दोन हप्त्यात तर अर्धा नत्र, संपुर्ण स्फुरद व पालाश बहाराचे पाणी देण्याअगोदर झाडास बांगडी पध्दतीने किंवा लॅटरल समांतर म्हणजेच झाडास ओळीचे समांतर झाडाचा विस्ताराचे थोडेसे आतील बाजूस एक ते दिड फूटाचे पट्यामधील माती बाजूला करून खते त्यामध्ये पसरवून खते बुजवून टाकावीत.

माती परिक्षणानुसार तसेच झाडामध्ये काही अन्नद्रव्याची कमतरता ची लक्षणे दिसत असतील तर त्याप्रमाणे सुक्ष्मद्रव्याची पूर्तता करावी किंवा 50 ग्रॅम सुक्ष्ममूलद्रव्य ग्रेड - I या वापर प्रतिझाड बहाराचे वेळेस करावा. त्यामुळे झाडे ताणास तोंड देण्यास सक्षम होतील व उच्च दर्जाचे फळांचे उत्पादन होईल.

**पाणी व्यवस्थापन** :-

सुरूवातीचे वाढीचे अवस्थेत झाडास तापमान, हवामान व जमिनीचा प्रकार नुसार झाडास पाणी द्यावे. फळबागाची लागवड ही ठिबक तंत्राचा वापर करूनच करावी. पाटाने पाणी अंजिरास देऊ नये. पाणी अंजिराचे खोडास लागणार नाही याची काळजी घ्यावी. पावसाची पाणी बागेत साठणार नाही याची दक्षता घ्यावी.

ठिबक प्रणालीचा वापर करत असताना 18 ते 20 एमएम ची लॅटरल घेवून त्यास 16 एमएम चे इनलाईन लॅटरल झाडाचे विस्ताराचे प्रमाणानुसार खोडापासून 2-3 फूट बाहेर गोलाकार अंथरून घ्यावी व त्यावर 1-2 लिटर डिस्चार्जचे ड्रिपर, एक फूट अंतरावर असावेत. जास्त डिस्चार्ज असलेले व ऑनलाईन लॅटरल फळबागासाठी वापरू नये. किंवा अंजिरासाठी 2 इनलाईन लॅटरल एक झाडाचे ओळीसाठी वापराव्यात. त्यावर एक फूट अंतरावर 1-2 लिटर डिस्चार्ज चे ड्रिपर असावेत. जमिनीची प्रत, फळ झाडाची अवस्था, हवामान, तापमान यावर झाडाची पाण्याची गरज अवलंबून असते. मातीमध्ये कायम वाफसा राहिल याचा विचार पाणी व्यवस्थापनामध्ये व्हावा.

काही शेतकरी अंजिर बागेच्या दोन ओळींमध्ये रेन पाईपद्वारे पाणी व्यवस्थापन करत आहेत. त्याचा वापर फायदेशीर आढळून आलेला आहे.

फळे वाढण्याच्या काळात पाण्याची कमतरता भासू देऊ नये तसेच फळे पक्व होण्याच्या काळात मात्र पाणी कमी प्रमाणात द्यावे. अन्यथा फळात गोडी उतरत नाही, अशी फळे बेचव लागतात. जमिनीत कायम ओलावा टिकून राहिला तर फळे भेगाळल्याचे प्रमाण वाढते. तसेच झाडामध्ये जमिनीलगत सुक्ष्म वातावरण तयार होऊन किड व रोगाचा प्रार्दूभाव वाढतो.

**आंतरमशागत, आंतरपिके व तणनियंत्रण** :-

अंजिर पिकामध्ये सुरूवातीचे वाढीचे अवस्थेमध्ये झाडाचे बाजूचा भाग हा निंदणी करून तणमुक्त ठेवावा व दोन ओळीमध्ये तणनाशक अथवा ग्रासकटरने तणांचा बंदोबस्त करावा. झाडावर बहार असल्यास शक्यतो रासायनिक तणनाशकांचा वापर टाळावा.



सुरूवातीचे 2 ते 3 वर्षे अंजिर बागेमध्ये आंतरपिके घेतल्यास त्यापासून थोडेफार अर्थाजन होते तसेच झाडांची चांगली निगा राखली जाते व जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते. मूग, उडीद, चवळी, सोयाबिन, फुलझाडे ई. आंतरपिकाची लागवड दोन ओळीमध्ये करता येते.

**बहार धरणे** :-

अंजिरामध्ये आपलेकडे दोन वेळा बहार धरता येतो. पावसाळी व उन्हाळी बहार. शेतकऱ्यांनी आपल्याकडील असलेली पाण्याची व्यवस्था, बाजार भावाचा अंदाज घेवून बहार निवडावा.

खट्टा बहारास पाण्याचा ताण मार्च ते मे या दरम्यान दिला जातो. मे मध्ये हलकी छाटणी करून पावसाचे पाण्यावर हा बहार घेतला जातो ती फळे जुलै - ऑगस्ट मध्ये तयार होतात ह्या बहाराची फळे आंबट व गोडीस बेचव असतात तर मिठा बहाराचे झाडास सप्टेंबर मध्ये 2 आठवडे ताण दिला जातो व बागेची मशागत करून खते दिली जातात. त्याची फळे मार्च - एप्रिलमध्ये बाजारात येतात या फळास गोडी चांगली असते. फळाचा दर्जा व उत्पन्न चांगल्या प्रतीचे मिळते. या बहारातील फळास बाजारभाव चांगला मिळतो. परंतू या बहारास खात्रीच्या पाण्याची गरज असते.

बहाराचे पाणी बंद करताना हळूहळू कमी करावे त्यानंतर जमिनीची हलकी मशागत करावी. झाडाची छाटणी करावी व शेणखत रासायनिक खताची मात्रा वर नमूद केले प्रमाणे बागेस द्यावी व दोन आठवड्यांनी टप्याटप्याने पाणी सुरू करावे.



**बहाराची छाटणी** :-

अधिक व उच्च दर्जाचे उत्पादन आणि तेही एकाच वेळी उत्पादन मिळविण्यासाठी अंजिराची छाटणी करणे आवश्यक असते. कारण अंजिराच्या झाडावर जी नवीन फूट येते त्या फुटीवरच विक्री योग्य फळे येत असतात. जर झाडाच्या फांद्या छाटल्या नाहीत तर उत्पादन कमी मिळते. खट्टा बहारासाठी एप्रिल-मे मध्ये झाडे सुप्त अवस्थेत गेलेली असतात व त्यांची बऱ्यापैकी पानगळ होते. बहार धरण्यापूर्वी झाडावरील राहिलेली पाने मजूरांकरवी काढून घेवून बागेची स्वच्छता केली जाते, खताची मात्रा देवून पाणी सुरू केले जाते. मिठा बहारासाठी बागेची छाटणी केली जाते. यासाठी मागील हंगामातील वाढलेल्या फांद्या 4-6 इंचावर मागे जावून छाटणी केली जाते म्हणजेच मागील हंगामातील वाढलेल्या फांदीस 1-2 डोळे ठेवून उर्वरित शेंड्याकडील भाग छाटला जातो ही झाडे त्यानंतर पावसाळा अखेरीस सुप्तावस्थेत जातात. सप्टेंबर नंतर तापमान वाढू लागले की झाडांना नवीन पालवी फुटण्यास सुरूवात होते, फांदीवरील डोळे भरून नव्या फूटी निघतात व त्या प्रत्येक फूटीस फळे लागतात.

छाटणीनंतर 500 PPM इथ्रेल ह्या संजिवकाची फवारणी केल्यास एकाच वेळेस सर्व डोळे फुटून भरपूर नवीन फांद्या पंधरवाड्यात फूटतात.

खट्टा बहारासाठी पाणी सुरू करत असतानाच खोडावर व फांद्यावर 10 मिलि हायड्रोजन सायनामाईड 50% प्रति लिटर पाण्यात घेऊन फवारावे त्यामुळे सर्व सुप्तडोळे फुटतात व झाडांना नवीन पालवी एकाच वेळीच येते.

**एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन :-**

अंजिर पिकावर खोड किडा, खोडाला लहान छिद्र पाडणारे भुंगेरे, कोळी, मिलिबग, खवलेकिड या रस शोषण करणाऱ्या किडीचा प्रार्दूभाव होतो. तसेच तांबेरा, पानावरील ठिपके, ॲंथ्रकनोज, फळावरील ठिपके, मोझॅक इ. रोगांचा प्रार्दूभाव होतो. अंजिरामध्ये तांबेरा या रोगाचा व खोड किडा या किडीचा प्रार्दूभाव जास्त होतो.

किड व रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना कराव्यात.

- लागवड मध्यम प्रतीच्या व उत्तम निचऱ्याच्या जमिनीत
- आपलेकडील हवामानानुसार बहार निवडावा
- लागवडीचे अंतर हे शिफारशीप्रमाणे ठेवावे त्यामुळे बागेत पुरेशी हवा खेळती राहिल व प्रत्येक फांदीस पुरेसा सूर्यप्रकाश मिळेल.
- अंजीर बागेस 4-5 खोडे ठेवावीत.
- बागेस बोर्डो / गेरू चा किडनाशकासोबत चा मुलामा वर्षातून 2 वेळा नियमितपणे लावावा.
- बागेची छाटणी ही " सेंटर ओपन " पध्दतीने करावी प्रत्येक फांदीवर पुरेसा सूर्यप्रकाश पडेल गर्दी / दाटी होणार नाही हे पाहावे.
- रोगासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी.
- बागेत सतत ओलावा राहणार नाही याप्रमाणे पाणी व्यवस्थापन करावे.
- रोगग्रस्त फांद्या / पाने / छाटणीनीचे अवशेष नष्ट करावेत.
- नत्रयुक्त खताचा शिफारशीतील वापर करावा, एकात्मिक खत व्यवस्थापन करावे.
- सुरूवातीस प्रतिबंधात्मक म्हणून निंबोळी अर्क 5% ची फवारणी घ्यावी.

ज्ञानाची शेती फायद्याची व आरोग्यदायी..!

**आळवण्या (Drainching)**

अंजीर पीक लागवड करतेवेळी व नंतर हंगामामध्ये 2 वेळा ट्रायकोडर्मा व्हिरीडी, मेटारायझम ॲनोसोप्ली, पॅसिलोमायसिस आणि सुडोमोनास फ्लोरोसन्स या सूक्ष्मजीवांची आळवणी करावी यामुळे पिकावर जमिनीतून येणाऱ्या रोगांवर नियंत्रण राहते तसेच पीक सुदृढ व निरोगी राहते. वरील मित्र बुरशी व जिवाणू एकरी 1 किलो प्रत्येकी याप्रमाणे प्रमाणात आळवणी करण्यात यावी. रासायनिक किटकनाशक तथा बुरशीनाशकाची जमिनीमधून आळवण्या करू नयेत.

पिकांचे नियमीत सर्वेक्षण करावे. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून जैविक किड / रोग नाशकाचा वापर पुढील प्रमाणे करावा. रस शोषण करणाऱ्या किडीसाठी व सर्व प्रकारच्या अळ्यांसाठी व्हर्टिसिलियम लेक्यानी, बिव्हेरिया बॅसिनिया, बॅसिलस थुरेंजिनिसिस, लॅक्टोबॅसिलस, नोमुरिया रिलाई व बॅसिलस सबटिलीस प्रत्येकी 5 ग्रॅम प्रति लिटर पाण्यात घेऊन पिकावर लागवडी नंतर 10/15 दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. ज्यामुळे रस शोषण करणाऱ्या किडीचे व अळ्यांचे नियंत्रण होते.

सूक्ष्मजीव फवारणी करताना त्यासोबत रासायनिक बुरशीनाशकांचा वापर करू नये. याची फवारणी सायंकाळी करावी.

**बोर्डो / गेरू पेस्टींग** :-

खोडकिडा व खोड पोखरणारे लहान भुंगेऱ्यासाठी झाडाचे खोड जमिनीपासून 2 ते 2.5 फूटापर्यंत मोकळी करावीत व त्यावर गेरू चा मुलामा द्यावा. गेरूचा मुलामा तयार करण्यासाठी 4 किलो गेरू 10 लिटर पाण्यात रात्रभर भिजू घालावा व दूसऱ्या दिवशी त्यामध्ये 25 ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड + क्लोरपायरीफॉस 50 मिली + स्टिकर 10-15 मिली मिसळून सर्व खोडास जमिनीपासून वरती फांद्यापर्यंत लावावे.

अंजिर पिकावर येणारा तांबेरा हा सिरोटीलीय फिकी या बुरशी मुळे होतो व ही बुरशी फक्त अंजिरावर वाढते. तांबेऱ्याचा प्रार्दूभाव हा पानाचे खालचे बाजूस सुरू होतो त्यामध्ये पिवळसर तपकिरी रंगाचे बुरशी किंचित लांबट उंचवटे, बुरशी चे फोड दिसतात. कालांतराने प्रार्दूभाव वाढून रोगग्रस्त पाने गळू पडतात व संपूर्ण पानगळ होते त्यामुळे फळे पोसत नाहीत. या रोगास अनुकूल वातावरण हे कमी तापमान 15-25$^0$C, हवेतील आर्द्रता 80% पेक्षा अधिक व दव पडल्यास फार झपाट्याने रोगाचा प्रसार होतो. पावसाळ्यापेक्षा थंडीच्या दिवसात या रोगाचा प्रार्दूभाव जास्त होताना आढळतो.

**तांबेरा रोगाचे नियंत्रणासाठी** - छाटणी झालेवर संपूर्ण झाडावर, झाडाखाली जमिनीवर गंधक 300 मेश 80 किलो एकरी या प्रमाणे धुरळावी किंवा 20-25 ग्रॅम गंधक 80% WP 10 लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

छाटणीनंतर 20 दिवसापासून 15 दिवसाचे अंतराने क्लोरोथॅलोनील 20 ग्रॅम + कार्बेनडॅझीम 10 ग्रॅम किंवा कार्बेनडॅझीम 10 ग्रॅम + मॅन्कोझेब 25 ग्रॅम (साफ) किंवा कार्बेनडॅझीम 10 ग्रॅम + कॅप्टन 20 ग्रॅम प्रति 10 लिटर पाण्यात घेवून या पैकी कोणतेही एका बुरशीनाशकाची फवारणी आलटून पालटून करावी.

वनस्पतीजन्य व जैविक किडनाशकांच्या फवारण्या नियमित घ्याव्यात व किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यास सोबतचे तक्त्यामध्ये नमूद केलेले किटकनाशक / बुरशीनाशकांचा शिफारशीप्रमाणे प्रमाण घेऊन सकाळी / सायंकाळी फवारण्या घ्याव्यात. किडनाशकांचा वापर हा दर वेळी वेगळ्या गटांचा करावा एकच एक गटातील किडनाशके वापरू नयेत, फळे काढणीच्या 1 महिना अगोदर रासायनिक किडनाशकांच्या फवारण्या बंद कराव्यात.

**फळाची काढणी व उत्पादन** :-

अंजिराचे फळाचे उत्पादन दूसऱ्या - तिसऱ्या वर्षापासून सुरू होते व ते सात आठव्या वर्षापर्यंत वाढत जाते व पुढे 25 वर्षापर्यंत उत्पादन देते. अंजिर हे पिक मुख्यत्वे सेंद्रिय खतांचा भरपूर वापर व मशागतीस प्रतिसाद देणारे पिक आहे.

अंजिराचे फळ म्हणजे अनेक फुलांच्या गुच्छाला आवरणाने पकडून धरलेला भाग. हे फळपिक खुप नाजूक असते त्यामुळे हलक्या हाताने काढणी करावी. काढणी करताना याचे देठातून पांढरा चिक निघत असतो त्यामूळे मजूरांना जखमा होतात. त्यासाठी हातमोजे (ग्लोज) वापरावेत. हे फळ झाडावरच पिकते, तोडणी केल्यावर पिकत नाही त्यामुळे तयार फळे काढावीत व बाजाराचे मागणीप्रमाणे प्रतवारी व पॅकींग करून बाजारात पाठवावीत.



लागवडीसाठी वापरलेल्या जमिनीचा मगदूर, हंगामातील हवामान / वातावरण व शेतकऱ्यांनी केलेले पिक व्यवस्थापन यावर उत्पादन अवलंबून असते. सरासरी एका झाडास 25-35 किलो फळे मिळतात. काही शेतकऱ्यांना जुन्या मोठ्या बागातून 85-90 किलो फळे मिळतात.

## अंजीर या पिकासाठी केंद्रिय किटकनाशक मंडळ आणि नोंदणीकृत समिती (CIBRC) व कृषि विद्यापीठ यांच्या किड / रोग निहाय, शिफारशी नाहीत परंतू खाली नमूद केलेली किटकनाशके / बुरशीनाशके शेतकरी सर्रास वापरतात.

| अ.क्र. | किड/रोगांचे नाव | किडनाशकाचे नाव क्रियाशील घटकाचे प्रमाण व गट | उत्पादकांचे नाव व ब्रँड नेम | एकरी प्रमाण | PHI |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मावा, पांढरी माशी | क्लोरोपायरिफॉस 20% EC | सुमिटोमो - ट्रायसेल | 400 | 14-21 |
| 2 | मिलि बग, मावा, पांढरी माशी | इमिडाक्लोप्रीड 17.8% SL | टाटा - कॉन्फीडॉर | 120-160 | 7-14 |
| 3 | फळमाशी, नागअळी व ईतर अळ्या | स्पिनोसॅड 45% EC | कॉरटेव्हा - ट्रेसर | 20-40 | 3-7 |
| 4 | मावा, पांढरीमाशी | सायपरमेथ्रीन 25% EC | सिंजेंटा - सिंबुश | 290-400 | 14-21 |
| 5 | मावा, पांढरीमाशी, मिलीबग, तुडतुडे | ॲसिटामाप्रीड 20% SP | टाटा - माणिक | 50-100 | 14 |
| 6 | मावा, पांढरीमाशी, मिलीबग, तुडतुडे | थायोमिथोक्झाम 25% WG | सिंजेंटा - ॲक्टरा | 40-80 | 14-21 |
| 7 | वाळवी, हुमणी, तुडतुडे | फिप्रोनील 5% SL | सिंजेंटा - रिजंट | 100-200 | 14-21 |
| 8 | मावा, फुलकिडे, पांढरी माशी, फळमाशी | लॅम्बडा सायहॅलोथ्रीन 5% EC | सिंजेटा - कराटे | 20-40 | 14-21 |
| 9 | मावा, फुलकिडे, पांढरी माशी, फळमाशी | बायफेंथ्रीन 25% EC | FMC - बिग्रेड | 200-400 | 14-21 |
| 10 | मावा, फुलकिडे, पांढरी माशी, फळमाशी | ॲझॅडीरेक्टीन 300 PPM | कोरामंडल - अझामिक्स | 500 | 3 |
| 11 | भूरी, करपा, फळसड, पानावरील ठिपके | मॅन्कोझेब 75% WP | इंडोफिल - डायफेन एम - 45 | 1000-1200 | 14 |
| 12 | भूरी, करपा, फळसड, पानावरील ठिपके | कार्बेनडॅझीन 50% WP | क्रिस्टल - बावीस्टीन | 200-400 | 7-14 |
| 13 | करपा, मर, केवडा, पानावरील ठिपके | कॉपर ऑक्सीक्लोराईड 50% WP | क्रिस्टल- ब्लू कॉपर | 800-1200 | 7-21 |
| 14 | भूरी, तांबेरा, पानावरील ठिपके, करपा | प्रोपीकोनेझोल 25% EC | सिंजेंटा - टिल्ट | 90-200 | 21 |
| 15 | भूरी, तांबेरा, पानावरील ठिपके, करपा व फळसड | थायोफिनेट मिथेल 41.7% SC | बायोस्टॅड - रोको | 200-400 | 14 |
| 16 | तांबेरा, करपा, भुरी, पानावरील ठिपके | ॲझोक्सीस्ट्रोबिन 23% SC | सिंजेटा - ॲमिस्टार | 80-100 | 14-21 |
| 17 | तांबेरा, भूरी, करपा, पानावरील ठिपके | टेबूकोनेझोल 25% EC | बायर - फॉलिक्युअर | 200-400 | 14-21 |
| 18 | भूरी, पानावरील ठिपके, तांबेरा, फळसड | क्लोरोथॅलोनिल 75% WP | सिंजेटा - कवच | 200 | 14-21 |
| 19 | केवडा, उशीरा येणारा करपा | डायमिथोमॉर्फ 50% WP | BASF - ॲक्रॉबॅट | 120-140 | 14-21 |
| 20 | केवडा, करपा, मूळसड | मेटॅलॅक्झील 4% WP + मॅन्कोझेब 64% | सिंजेटा - रिडोमिल गोल्ड | 400 | 21 |
| 21 | तांबेरा, पानावरिल ठिपके | कॅप्टन 50% WP | टाटा - कॅपटाफ | 600 | - |
| 22 | तांबेरा, पानावरिल ठिपके | झायनेब 78% WP | इंडोफिल - Z - 78 | 400 | - |